प्रेसनोट दिनांक १०/०१/२०१९

## वनपरिक्षेत्र कार्यालय ईस्लापूर ता.किनवट येथील वनपरिमंडळ अधिकारी शिवप्रसाद बसलींगअप्पा मठवाले, यांनी ६,०००/—रु. लाचेची मागणी केल्या बाबत नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल

दिनांक २६/१२/२०१८ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार त्यांचे शेतातील केळीच्या पिकास राडुकरांनी नासधुकस करून केलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मंजुर करून आणुन देतो म्हणुन लोकसेवक मठवाले, वनपरिमंडळ अधिकारी हे १०,०००/—रू.लाच मागन असल्याची तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीवरून दिनांक २७/१२/२०१८ रोजी लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक मठवाले यांनी तक्रारदार यांचे शेतातील केळीच्या पिकास राडुकरांनी नासधुकस करून केलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मंजुर करून आणुन देतो म्हणुन १०,०००/—रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती ६,०००/—रू. स्विकारण्याचे मान्य करून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणुन दिनांक १०/०१/२०१९ रोजी लोकसेवक शिवप्रसाद बसलींगअप्पा मठवाले, (वनपाल) वनपरिमंडळ अधिकारी ईस्लापूर नेमणुक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय ईस्लापूर ता.किनवट जिल्हा नांदेड यांचे विरूध्द पोलीस ठाणे ईस्लापूर ता.किनवट येथे गुन्हा रजिस्टर नंबर ०३/२०१९ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक संशोधन अधिनियम २०१८ नुसार गुन्हा दाखल करून तपास पोलीस उप अधिक्षक श्री विजय डोंगरे लाचलूचपत प्रतिबंधक विभाग नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री संजय लाटकर, अपर पोलीस अधीक्षक सौ.अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री विजय डोंगरे, पो.ना. श्री शेख चाँद, श्री साजीद अली, पोकॉ श्री सुरेश पांचाळ, श्री अंकुश गाडेकर, व चा.पोना श्री शिवहार किडे,यांनी पार पाडली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप अधिक्षक श्री विजय डोंगरे, ला.प्र.वि.नांदेड हे करीत आहेत.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमाक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमाक ०२४६२—२५३५१२
३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमाक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड युनिट

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.